# प्रतीक्षा यादीतील ४५ उमेदवारांना नियुक्ती पत्र

**नाशिक** : भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त जिल्हा परिषद नाशिक येथे ध्वजारोहण सोहळा उत्साहात पार पडला. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक ओमकार पवार यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले.  यावेळी जिल्हा परिषदेतील उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांनी 'अवयवदान प्रतिज्ञा' व 'अमली पदार्थ विरोधी प्रतिज्ञा' घेतली.

मुख्य कार्यकारी अधिकारी पवार यांच्या संकल्पनेतून "**पोषण दूत अभियान**" या नव्या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. या अंतर्गत जिल्ह्यातील कुपोषित बालकांना अधिकारी व कर्मचारी दत्तक घेऊन त्यांना पोषणयुक्त आहार व आवश्यक औषधोपचार देऊन कुपोषणमुक्त करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या कार्यक्रमात जिल्हा परिषद पदभरतीतील प्रतीक्षा यादीतील ४५ उमेदवारांना नियुक्ती आदेशांचे वितरणही करण्यात आले. यामध्ये कनिष्ठ सहायक (लिपिक) ५, कनिष्ठ अभियंता (ग्रामीण पाणी पुरवठा) १, कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) १, ग्रामपंचायत अधिकारी २, आरोग्य सेवक (५०%) २७ आणि आरोग्य सेवक (४०%) ९ व अशा एकूण ४५ उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात आल्या. यानंतर संध्याकाळी ५ वाजता संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांची प्रतिमा मूर्तीची पालखी मिरवणूक काढण्यात आली.

यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अर्जुन मुंडे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रतिभा संगमनेरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सामान्य प्रशासन दीपक पाटील, मुख्या लेखा व वित्त अधिकारी मारुती मुळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत डॉ. वर्षा फडोळ, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे, कृषी विकास अधिकारी संजय शेवाळे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी हर्षदा बडगुजर , जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ.संजय शिंदे, जिल्हा जलसंधारण अधिकारी वैशाली ठाकरे, कार्यकारी अभियंता संदीप सोनवणे, कार्यक्रम अभियंता पंकज मेतकर, प्रभारी शिक्षणाधिकारी भास्कर कनोज यांच्यासह अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.